# पी.डब्लू.डी.व्ही.ए.नं. ४०/२०२४ मधील अंतरिम अर्जावरिल आदेश

**CNR No. MHST07-001707-2024**

**विश्रांती रोहित यादव वि. रोहित अशोक यादव**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे दरम्यानची पोटगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात असे की :-**

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, तिचा विवाह सामनेवाला क्र. १ यांचेसोबत दि. २७.०४.२०२३ रोजी गारवडे, ता.पाटण, जि.सातारा येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे झालेला होता. सदर विवाहसंबंधातून त्यांना समर्थ हा मुलगा झालेला आहे. लग्नानंतर सामनेवाला यांनी अर्जदार हीस काही दिवस चांगले नांदविले. त्यानंतर सामनेवाला यांनी अर्जदार हिस तुझ्या आई वडिलांनी लग्नात सोने दिले नाही, हुंडा दिला नाही, आमचा मान-पान केला नाही असे टोमणे मारण्यास सुरुवात केली. सदर बाब अर्जदार हिने माहेरी सांगितली असता सामनेवाला यांनी अर्जदार हिस मारहाण व शिवीगाळ केली. तसेच सामनेवाला यांनी किरकोळ कारणावरुन अर्जदारास सतत मारहाण व शिवीगाळ करुन तिचा शारिरिक व मानसिक छळ केला. तसेच अर्जदार ही बाळंतपणासाठी माहेरी गेली असताना सामनेवाला क्र. १ याने त्याचे पूर्वी प्रेम असलेली मुलगी निकीता निकम हिच्या सोबत दि. ०२.०३.२०२४ रोजी दुसरा बेकायदेशीर विवाह केला. अशाप्रकारे सामनेवाला यांनी अर्जदाराचा किरकोळ कारणावरुन मारहाण, शिवीगाळ करुन तिचा शारिरिक व मानसिक छळ केला. त्यामुळे अर्जदार हिने अशी विनंती केली आहे की, तिचा व मुलगा समर्थ यांचा चरितार्थ चालविणेसाठी प्रतिमहिना र.रु. ३५,०००/- अंतरिम पोटगी व घरभाडयासाठी र.रु. १५,०००/- मंजूर होवून मिळावी.

३. सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या अंतरिम पोटगी अर्जावर म्हणणे नि. १२ वर दाखल करुन अर्जातील सर्व कथने खोटी व लबाडीची असून, त्यांना ती मान्य व कबूल नसल्याचे सांगितले आहे. सामनेवाला यांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही

सामनेवाला क्र. १ याच्याकडे लग्नासाठी तगादा लावत होती व तसे न केल्यास जिव देण्याची धमकी देत होती. सामनेवाला क्र. १ व अर्जदार यांचा विवाह गारवडे ता.पाटण येथे कधीही झालेला नव्हता व नाही. केवळ अर्जदार हिस विवाहापासून परावृत्त करण्यासाठी विवाह झालेचे घरच्यांना भासविण्यासाठी खोटे प्रतिज्ञापत्र केलेले आहे. त्यानंतर अर्जदार ही विनाविवाह सामनेवाला सोबत राहू लागली. त्यानंतर किरकोळ कारणावरुंन अर्जदार ही भांडण करित असे तसेच रुसून बसत असे. तसेच अर्जदार ही सतत सामनेवाला याच्या चारित्र्यावर संशय घेत असे. त्यानंतर अर्जदार ही गरोदर राहिल्यानंतर मी खेडेगावात राहणार नाही असे म्हणून स्वतःहून घर सोडून माहेरी गेली होती. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कधीही शारिरिक व मानसिक छळ केला नाही. सामनेवाला हा आजही अर्जदार व मुलगा समर्थ यांचा सांभाळ करण्यास तयार आहेत. त्यामुळे अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

४. उभय पक्षकारांचे कथने विचारात घेता अर्जाच्या निर्णयासाठी खालील वादप्रश्न उपस्थित झाले. त्यासंबंधीचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत.

| अ.नं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथम दर्शनी सिद्ध करते काय की, सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे ? | होय |
| २. | अर्जदार हे सिध्द् करतात काय की, सा.वाला यास उत्पन्नाचे साधन आहे ? | होय |
| ३. | अर्जदार हे सिद्ध करतात काय की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही ? | होय |

| | | |
|---|---|---|
| ४. | अर्जदार ही सा.वालाकडून अर्जात नमुद केल्याप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय? जर होय, तर कोणते आदेश ? | होय, अंतीम आदेशाप्रमाणे |
| ५. | कोणता आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्र. १ करिता :–</u>**

५. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचे लग्न झाले असून इतर सामनेवाला हे सामनेवाला क्र. १ चे नातेवाईक असल्याचे कथन अर्जदार हिने तिचे अर्जात तसेच शपथपत्रात कथन केलेले आहे. परंतु, सामनेवाला याने त्याचा व अर्जदाराचा विवाह झालेला आहे ही बाब अमान्य केलेली आहे. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह झाला ही बाब सिदध करण्यासाठी अर्जदार हिने त्यांच्या लग्नाचे फोटो तसेच नोटरी समक्ष केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता हे सिद्ध होते की, अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि. २७.०४.२०२३ रोजी गारवडे, ता.पाटण, जि.सातारा येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे झालेला असून सदर विवाह हा दोघांनी एकमेकांच्या पसंतीने, कोणत्याही दडपणास बळी न पडता, स्वखुषीने नातेवाईकांच्या समक्ष केलेला आहे. तसेच सामनेवाला याच्या कथनाप्रमाणे अर्जदार ही त्याच्या सोबत विनाविवाह राहत होती, असे जरी गृहित धरले तरी ते विवाहसदृष्य नातेसंबंधात होते ही बाब प्रथमदर्शनी सिद्ध होते.

६. अर्जदार हिने तिचे शपथपत्रात असे नमुद केले आहे की, विवाहानंतर अर्जदार हिला सामनेवाला व त्याच्या घरच्यांनी शारिरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात

केली, अर्जदार हिस तुझ्या आई वडिलांनी लग्नात सोने दिले नाही, हुंडा दिला नाही, आमचा मान–पान केला नाही असे टोमणे मारण्यास सुरुवात केली, सदर बाब अर्जदार हिने माहेरी सांगितली असता सामनेवाला यांनी अर्जदार हिस मारहाण व शिवीगाळ केली. परंतु सामनेवाला याच्या स्वभावात बदल होईल या आशेवर अर्जदार ही निमुटपणे त्रास सहन करत होती. सामनेवाला क्र. १ हा किरकोळ कारणांवरुन अर्जदार हिला सतत मारहाण करुन शिवीगाळ करत होता व सर्व सामनेवाला हे तिला टोचून बोलून तिला मारहाण करुन तिचा शारिरिक व मानसिक छळ करत असत. त्यानंतर बाळंतपणासाठी म्हणून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. त्यानंतर सामनेवाला याने बेकायदेशीर दुसरे लग्न केले आहे. त्यामुळे अर्जदार ही तेव्हापासून तिच्या माहेरीच राहत आहे.

७. याउलट, सामनेवाला यांनी त्यांच्या खुलाशामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याच्याकडे लग्नासाठी तगादा लावत होती व तसे न केल्यास जिव देण्याची धमकी देत होती. केवळ अर्जदार हिस विवाहापासून परावृत्त करण्यासाठी विवाह झालेचे घरच्यांना भासविण्यासाठी खोटे प्रतिज्ञापत्र केले त्यानंतर अर्जदार ही विनाविवाह त्याच्या घरी राहू लागली, त्यानंतर किरकोळ कारणावरुंन अर्जदार ही भांडण करुन रुसून बसत असे. तसेच अर्जदार ही सतत सामनेवाला याच्या चारित्र्यावर संशय घेत असे. त्यानंतर अर्जदार ही गरोदर असताना गावात चांगले दवाखाने नाहीत म्हणून तिच्या माहेरी स्वतःहून गेलेली आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदाराचा कधीही शारिरिक व मानसिक छळ केलेला नाही.

८. अर्जदार व सामनेवाला यांचे कथनावरुन, हे स्पष्ट होते की, अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार माहेरी राहण्याचे कारण उभय पक्षकारांनी वेगवेगळे नमुद केले आहे. असे असले तरी, अर्जदार ही कोणत्याही ठोस कारणाशिवाय तिचे सासरचा

त्याग करुन माहेरी जाईल हे पटत नाही. तसेच अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासून सामनेवाला क्र. १ याने तिच्या व मुलगा समर्थ यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही तरतूद केलेली दिसून येत नाही. सदरची बाब ही आर्थिक हिंसाचार या प्रकारात मोडते. सबब, प्रथमदर्शनी हे सिद्ध होते की, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**वादप्रश्न क्र. २ ते ५ करिता :–**

९. सामनेवाला याने त्यांच्या खुलाशात अर्जदार हिला आर्थिक उत्पन्नाचे साधन आहे व ती स्वतःचा तसेच मुलगा समर्थ यांचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे ही बाब कोठेही नमुद केलेली नाही. तसेच मुलगा समर्थ हा अज्ञान असल्याने तो देखील स्वतःचा उदरनिर्वाह करु शकत नाही. सबब, अर्जदार ही तिचा व मुलगा समर्थ यांचा उदरनिर्वाह करु शकते ही बाब प्रथमदर्शनी सिद्ध होत नाही.

१०. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जात असे नमुद केले आहे की, सामनेवाला याचा ट्रक्टर असून त्यातून त्याला दरमहा र.रु. ५० ते ६० हजार उत्पन्न मिळते. तसेच ८ ते १० एकर शेती असून त्यातून त्याला ६ ते ७ लाख उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला याचे घरी म्हैशी, शेळी यासारखे जनावरे असून दुध विक्रीच्या व्यवसायातून त्याला ४५ ते ५० हजार इतके उत्पन्न मिळते. सदरची बाब सामनेवाला याने स्पष्टपणे नाकारली आहे. सामनेवाला याने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात त्याचा व्यवसाय मजुरी नमुद करुन त्यास दरमहा ५,०००/– उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. तसेच त्याने त्यांना शेती असल्याचे नमुद केले आहे, परंतु शेती किती आहे हे त्याने नमुद केलेले नाही. अर्जदार हिने नि. ११ लगत दाखल केलेल्या सामनेवाला याच्या घराचे फोटो व शेतजमिनीचे ७ x १२ उतारे दाखल केले आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, सामनेवाला याच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे.

११. अर्जदार हिने सामनेवाला याच्याकडून तिचे दरमहाचे उदरनिर्वाहासाठी रक्कम रुपये १५ हजार, मुलोच उदरनिर्वाहासाठी र.रु. १० हजार व घरभाडे र.रु. १० हजाराची मागणी केली आहे. परंतु तिचे दरमहा खर्चाबाबतचे विवरण तिने नमुद केलेले नाही. अर्जदार हिचा दरमहाचा खर्च व सामनेवाला याचे दरमहाचे उत्पन्न याचा विचार करता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून अर्जदार हिस उदरनिर्वाहासाठी रक्कम रुपये ४,०००/–, मुलगा समर्थ याचे उदरनिर्वाहासाठी र.रु. ३,०००/–, घरभाडेपोटी र.रु. २,०००/– व न्यायालयीन खर्चासाठी दरमहा र.रु. १,०००/– अदा करण्याबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते. वरिल विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून दरमहा रक्कम रुपये ४,०००/–, मुलगा समर्थ याचे उदरनिर्वाहासाठी र.रु. ३,०००/–, घरभाडेपोटी र.रु. २,०००/– व न्यायालयीन खर्चासाठी दरमहा र.रु. १,०००/– अदा करावे.

३. प्रस्तुत अर्जाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

स्थळ : कराड ( एम.व्ही.भागवत )

दिनांक : २८/११/२०२४ ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड.